जा.क्र. २६६५/रोविवि/कॅमेरा/२०२०
जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर
दिनांक: ०८/१०/२०२०.

# जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर.
## दरपत्रक मागविण्याकरीता सूचना

### फोटो घेणारी यंत्रे (कॅमेरे) व इतर संबंधित साहित्य, यंत्रणेची एका वर्षासाठी बहुव्यापक (Comperhensive) देखभालीकरीता (Maintenance) दरपत्रक मागविण्याकरीता सूचना

जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथे बसविण्यात आलेले एकुण ६८ फोटो घेणारी यंत्रे (कॅमेरे) व त्यासंबंधित साहित्य/यंत्रणेची सप्टेंबर २०२० ते ऑगष्ट २०२१ या कालावधीकरीता बहुव्यापक (Comperhensive) देखभालीकरीता खालील अटींवर दि. २०.१०.२०२० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत "मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर" यांचे नावाने सीलबंद लिफाफे (दरपत्रक) मागविण्यात येत आहेत.

१. फोटो घेणारी यंत्रे (कॅमेरे) व इतर साहित्य/यंत्रणेचा बहुव्यापक (Comperhensive) देखभाल करार सप्टेंबर २०२० ते ऑगष्ट २०२१ पर्यंत १२ महिन्यांकरीता राहील.
२. प्रत्येक तीन महिन्यांनंतर करार देयकाची रक्कम दिल्या जाईल.
३. दरपत्रकामध्ये मेन्टेनेन्स दर व इतर साहित्याचे दर आणि त्यावरील GST चे दर वेगवेगळी दाखवून रक्कम नमूद करावी.
४. फोटोघेणारी यंत्रे (कॅमेरे) नादुरुस्त झाल्यास दुरुस्त करणे, इतर साहित्य दुरुस्ती व देखभाल, तसेच आवश्यक असल्यास कॅमेरा किंवा इतर साहित्य नविन बसविणे अशी सर्व कामे कंत्राटदाराला करावी लागतील. तसेच, वर्षभर ६८ कॅमेरे व इतर साहित्य सुस्थितीत कार्यरत राहील अशी व्यवस्था करावी लागेल.
५. कंत्राटदाराला जिल्हा न्यायालय, नागपूर येथे दर आठवडयाला व तक्रार असल्यास ताबडतोब येवून यंत्रणेची तपासणी करुन ती व्यवस्थित कार्यरत आहेत असे प्रमाणपत्र काळजीवाहक, जिल्हा न्यायालय, नागपूर यांचेकडे द्यावे लागेल.
६. कॅमेरे व इतर संबंधित साहित्य/यंत्रणेची समाधानकारक देखभाल केलेली आढळून न आल्यास करार रद्द करण्यात येईल.
७. फोटो घेणारी यंत्रे व संबंधित साहित्य व यंत्रणेमध्ये खालील बाबींचा समावेश आहे. डोम कॅमेरे-४८, बुलेट कॅमेरे-२० असे एकुण कॅमेरे ६८,डीव्हीआर-२ (64 Channel Network Video Recorder with Hard disk drive-1 no. + 4 Channel Network Video Recorder with Hard Disk Drive-1 no.), रॅक-९ (6 u rack wall mount) , लेन्स-२० (5-50 MM Lens for Bullet), केबल-२४ (Cat 6 cable 305 mtr. each box), केबल-७३२० (Cat 6 cable laying), स्वीच-९ (24 port POE switch 10x100 with 2 combo), टी.व्ही.-१ (40" Full HD TV).
८. मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपूर यांना दरपत्रक नामंजूर करणे, दरपत्रकात दुरुस्ती/बदल करण्याचा अधिकार राहील.

आदेशान्वये

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
नागपूर